महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांना सहसंचालक संवर्गात पदोन्नतीकरिता महसुली विभाग पसंतीक्रम मागविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/२०२५/८००
तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊस समोर, जमशेदजी टाटा मार्ग,
चर्चगेट, मुंबई-४०००२०.
दिनांक:- १४ ऑगस्ट, २०२५

संदर्भ: - शासन, वित्त विभाग पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४६/कोषा.प्रशा-२, दि.१४/०८/२०२५.

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांना सहसंचालक संवर्गात पदोन्नतीच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भीय शासन पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार, सहसंचालक संवर्गाच्या सन २०२४-२०२५च्या निवडसूचीमध्ये सोबतच्या यादीतील उपसंचालक संवर्गातील **२१** अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

२. सहसंचालक संवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नतीने पदस्थापना देण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदी विचारात घेऊन यादीत नमूद अधिकाऱ्यांनी आपला महसुली विभाग पसंतीक्रम सोबत जोडलेल्या विकल्प नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह मंगळवार, दि.१९ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत संचालनालयास सादर करावा.

३. हे परिपत्रक संचालनालयाच्या https://mahakosh.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून त्याकरिता स्वतंत्र पत्र निर्गमित केले जाणार नाही, याची संबधितांनी नोंद घ्यावी. संबधित अधिकाऱ्यांनी आपले विकल्प प्रत्यक्ष संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे अथवा jdtransfer2021@gmail.com याच ई-मेलवर (स्वाक्षरी केलेले विकल्प व कागदपत्रे केवळ PDF स्वरूपातच) विहित मुदतीत सादर करावेत. संचालनालयाच्या अन्य ई-मेलवर पाठविण्यात आलेले विकल्प विचारात घेतले जाणार नाहीत. ई-मेलद्वारे सादर केलेल्या विकल्पाची मूळ स्वाक्षरीकृत प्रत संचालनालयास तात्काळ सादर करावी. संचालनालयास प्रत्यक्ष प्राप्त होणारा किंवा ई-मेलवर प्राप्त होणारा पहिला विकल्प ग्राह्य धरण्यात येईल; तद्नंतर प्राप्त होणारे विकल्प ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच विहित नमुन्यात कोणताही विकल्प न देता प्राप्त होणाऱ्या अथवा विकल्प नमुना स्वाक्षरीकृत न केलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रशासकीय सोईनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल. **एकदा दिलेला विकल्प कोणत्याही परिस्थितीत बदलता अथवा मागे घेता येणार नाही याची सर्व सबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.**

(कृ.मा.पा.)

४. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील रिक्त पदांची विभागनिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | महसुली विभाग | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|
| १ | नागपूर | ०१ |
| २ | अमरावती | ०० |
| ३ | छत्रपती संभाजीनगर | ०० |
| ४ | कोंकण-१ | ०१ |
| ५ | नाशिक | ०२ |
| ६ | कोंकण-२ | १३ |
| ७ | पुणे | ०४ |

सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२ दि.१४/०७/२०२१ मधील तरतुदीनुसार महसुली विभाग वाटप करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

रश्मी नांदिवडेकर

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य
मुंबई

सोबत: (१) अधिकाऱ्यांची यादी
(२) विकल्प नमुना

# अधिकाऱ्यांची यादी

| अ.क्र. | नाव | अ.क्र. | नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री.महेश जगन्नाथ अवताडे | १२ | श्री.शिवप्रकाश रमणदास चन्ना |
| २ | श्रीम. कांचन बब्रुवान तावडे | १३ | श्री.रविकुमार बालाजीराव लिंगनवाड |
| ३ | श्री. बबन पांडुरंग भालेराव | १४ | श्री.दिनकर वासुदेव जाधव |
| ४ | श्री.कालिदास रामराव जाधव | १५ | श्री.विठ्ठल शिवाजी चव्हाण |
| ५ | श्री. बाबुलाल दत्तात्रय पाटील | १६ | श्री.चंद्रकांत पुंडलिक वानखेडे |
| ६ | श्रीम. शिल्पा रजनीश खळे | १७ | श्री.मनोजकुमार श्रेणीक शेटे |
| ७ | श्रीम. संगीता गणेश जोशी | १८ | श्रीम.रुपाली शंकर कोळी |
| ८ | श्री. प्रविण धोंडीराम निर्मळ | १९ | श्री.धनाजी हणमंत शिंदे |
| ९ | श्री. बसवेश्वर महादेव पाटील | २० | श्रीम.सुचिता राहूल साकोरे |
| १० | श्री.राजू पांडूरंग सोळुंके | २१ | श्री.शिरीषकुमार दादाराव धनवे |
| ११ | श्री.किरण बलवंत तायडे | | |

# विकल्पाचा नमुना

सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना असाधारण क्रमांक १२० क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४/०७/२०२१, अनुसार विभागीय संवर्गाकरिता द्यावयाचा विकल्प नमूना "ब" (बंधपत्र) (पदोन्नतीने नियुक्ती संदर्भात)

मी,श्री./श्रीमती/कुमारी.......................................................................................................
याद्वारे असे लिहून देतो/देते की, माझा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील पदावर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीत समावेश असल्याचे मला संचालनालयाचे परिपत्रक क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/२०२५/८००, दि.१४/०८/२०२५ अन्वये कळविले आहे. सदर पदास "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१" लागू असून माझी सहसंचालक संवर्गात पदोन्नतीने नियुक्ती झाल्यावर या नियमावलीतील तरतुदी मला लागू होणार आहेत.

सदर नियमावलीतील तरतुदींच्या अनुषंगाने मी सहसंचालक पदावर पदोन्नतीने नियुक्तीनंतर माझा पहिला पसंतीक्रम # ........................................... या विभागीय संवर्गासाठी देत आहे.

तसेच- *i) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील अ.क्र.०७ मध्ये माझे प्रकरण येत नाही.

*ii) उपरोक्त शासन अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील अ.क्र.०७ मध्ये माझे प्रकरण येत असून तदपृष्ठ्यर्थ आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या व दस्तावेजांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.

(जोडलेल्या कागदपत्रांची यादी)

दिनांक:
ठिकाण:

(स्वाक्षरी)

संपूर्ण नाव:............................................................
भ्रमणध्वनी क्र.:.........................................................
ई-मेल:...................................................................

# १) नागपूर, २) अमरावती, ३) छत्रपती संभाजीनगर, ४) कोंकण-१, ५) नाशिक, ६) कोंकण-२, ७) पुणे यापैकी कोणताही एक महसुली विभाग नमूद करावा.

*लागू नसेल ते खोडावे